## प्रकरण ६ वे

# उपसंहार

# प्रकरण सहावे
# उपसंहार

'कादंबरी' हा वाङ्मय प्रकार इंग्रजी राजवटीत जन्माला आला. मराठी कादंबरीचा उगम आणि तिच्या वाटचालीकडे दृष्टीक्षेप टाकताना देशी इतिहास पहावा लागतो. कादंबरी वाङ्मयप्रकार जरी आधुनिक असला तरी त्याचे बीज फार पुरातन आहे. 'गोष्ट सांगणे आणि ऐकणे' ही मानवाची उपजत वृत्ती आहे. मानसाला निसर्गामध्ये वावरताना काही अनुभव आले ते त्याने वेदांमधील कथांत व अद्‌भुत कथेत लिहून ठेवले. केवळ करमणुकीविषयी म्हणून ज्या गोष्टी सांगितल्या गेल्या त्यात अद्‌भूतता व आदर्शाचे संयुक्तीकरण दिसून येते. गुणाढ्याची 'बृहत्कथामंजरी'सोमदेवाचा 'बृहत्ककथा सरित्सागर'यासारख्या ग्रंथामध्ये विशेषत्वाने दिसून येते.

'श्रीमती आशा बगे' याचे लेखन नवोदित कथेच्या अभिव्यक्तीच्या अंगाने आले आहे. त्यांची कादंबरी स्वातंत्र्योत्तर कालखंडातील आहे. त्यांच्या कादंबरीमध्ये स्त्रिया त्यांचे अनुभवविश्व पारंपारिकतेला छेद न देता आपले अनुभव विश्व साकारण्याचा प्रयत्न करताना दिसतात. स्त्रीला तिच्या अस्मितेची जाणीव करून दिली. जीवनाशयाकडे एका वेगळ्या पातळीवरून स्त्री म्हणून मर्यादा जुनी परंपरा आणि कलेच्या संदर्भात एका पिढीकडून आलेला वारसा दुसऱ्या पिढीने टिकवला पाहिजे. या ओढीतून त्यांनी आपल्या साहित्य कृतीला न्याय दिला. मध्यम वर्गीय कुटूंबाचे नातेसंबंध त्यांचे रितीरिवाज व दैनंदिन जीवन यांचे सुस्पष्ट प्रतिबिंब दिसते.

'श्रीमती आशा बगे' यांनी आपल्या साहित्यातून स्त्रियांचे भावविश्व उलगडून दाखविले आहे. त्यांची पात्रे नैतिक मूल्ये जपणारे आहे. काही पात्रे कौटूंबिक व सामाजीक स्तरातील आहेत. मानवी मन जाणून घेण्याची संवेदनशिलता आशाबाईंकडे अमर्याद आहे. 'आशा बगे' यांच्या कादंबरीमध्ये कुठेही अश्लिलता येत नाही. स्त्री-पुरूष संबंध जवळ जवळ शृंगारिकपणे चित्रित

करण्याचा अभाव त्यांच्या कादंबरीत आहे. सामाजिक स्वरूपाच्या घटना, सामाजिक प्रश्न त्याच्या कादंबरीत दिसत नाही. विषयाची विविधता ही फारशी दिसून येत नाही. व्यक्तिवाङ्मयाचा अन्योन्य संबंध चित्रित केलेला दिसतो.

केव्हा केव्हा काव्यात्मकता आढळते तर काही कथेतील वातावरण संगीतमय असल्याचे जाणवते आशा बगे स्वत: संगीतमय असल्याचे जाणवते आशा बगे स्वत:संगीतातील 'एम. म्युझिक' पदवीधर असल्याने व लहानपणापासून संगीताच्या मैफिली ऐकल्याने त्यांच्या रोमारोमात संगीत भिनले आहे. एकत्र कुटूंब व श्रीमती सुसंस्कार असल्याने किर्तन, भजन, वडिल व भाऊ, ब्रह्म निरूपणासह सांगायचे. त्यांच्या कथा-कादंबरीतील स्त्रिया संमजस आहेत. त्यांनी जे लिहिले ते प्रत्यक्ष अनुभवातून व अवलोकनातून कथेतील पात्रे ठसठसीत आहेत. कुठे ही अलंकाराचा सोस नाही. की कोणताही हव्यास नाही साधी स्त्रीसुलभ भाषा अशी त्यांची भाषाशैली आहे. स्त्रीसुलभ, स्त्रीमधील स्वत्व, सत्व, कुटूंबाप्रती वात्सल्य, प्रेम, आपल्या घराशी, कुटूंबाशी मातीशी असणारे नाळेचे नाते यातून आत्मशोध, अस्तित्वाचा शोध घेते. मित्र, पती, मुलगा आश्वासक अश्या भिन्न भिन्न भूमिकांमधील निर्भेळ, शुध्द, बंध शोधणे हा आत्मा आहे. मराठी प्रतिमासृष्टी आरसपानी साधीसुधीशैली माणसामाणसातील भावबंधाविषयीची आश्वासक गाढ समज हे या लेखिकेचे सामर्थ्य आहे.

'आशा बगे' यांच्या कादंबरीमध्ये कुठेही अश्लिलता दिसून येत नाही. स्त्री-पुरूष संबंध हे भारतीय संस्कृतीप्रमाणेच मर्यादेतच चित्रित करताना त्यातून शृंगार दिसून येत नाही. विषयाची विविधता त्यांच्या लेखणात दिसत नाही. 'आशा बगे' ह्या प्रतिभावंत लेखिका असून त्यांची व्यक्तीचित्रणे रडकी नसून येणाऱ्या संकटांना धीराने सामोरी जाणारी दिसतात. त्यांच्या कथा-कादंबरीतील पात्रे शांत,संयमी दिसतात. काळ बदलला तरी नवीन तंत्रज्ञानात बदल झालेला असतानाही आहे त्याच गतीने चाललेला शंतनू दिसतो. पित्यावर प्रेम करणारा पुत्र, माय-लेकी सारखे अव्दितीय नाते जपणारी आत्या, मैथिली दिसतात. त्यांना वृद्ध माणसे, जमीनदारी, श्रीमंत घरातील नाते संबंध आश्रयदाते आश्रीत अशा व्यक्तीरेखा त्यांच्या कादंबरीतून दिसून

येतात.

'आशा बगे' स्त्रीसुलभ स्वभावानुसार, स्त्रीमधील स्वत्वाशं, मुलाविषयी वासल्य भावना, कलाकृतीतून पाहण्याचा डोळसपणा, श्लोक, इंग्रजी शब्दांचा वापर माणसामाणसातील भावबंधाविषयी आश्वासक गाढ समज हे या लेकिकेचे सामर्थ्य आहे. स्त्रियांचे दु:ख मांडताना देखील अगतिकता जाणवत नाही. गुंतागुंतीच्या नात्याचा त्या शोध घेतात.

स्त्रियांचे लेखन व स्त्रीवादी लेखन यात फरक दाखविलेला आहे पितृसत्ताक समाज व्यवस्थेने दडपून टाकलेल्या कोंडमारा झालेल्या स्त्रीमनाचा व स्त्री जीवनाचा त्या समाजव्यवस्थे विरूध्द संघर्षाचा अविष्कार घडविणारे साहित्य म्हणजे स्त्रीवादी होय. साहित्यकृतीचे मुल्यमापन करताना त्यातील स्त्री प्रतिमा, तिचे रूप, म्हणजे स्त्रीपणाचे किंवा बाईपणाचे त्यातून स्त्रीकडे समाजाचा पाहण्याचा दृष्टीकोन म्हणजे स्त्रीवादी समिक्षा होय.

स्त्रीवादी लेखिका आपले विश्व नव्याने घडविण्याचा प्रयत्न करते. स्त्रीच्या माणूसपणाचा विचार हे स्त्रीवादी विचारसरणीचे केंद्रस्थान आहे. बदलते समाजजीवन विज्ञानाचा उदय शिक्षणाने मिळालेला आत्मविश्वास दुर्बल व पराधीन आयुष्याची जाणीव झाल्याने समाजवादाविरूद्ध आवाज उठविला. स्त्रीवाद म्हणजे पुरूषापासून फारकत घेवून स्त्रीने स्वतंत्र राहणे नसून स्व:सामर्थ्याचा शोध घेऊन पुरूषाच्या बरोबरीने संधी मिळविण्यासाठी त्याच्या खांद्याला खांदा लावून पितृसत्ताक समाजव्यवस्थेने प्रस्थापित केलेल्या परंपरा मोडून आपल्या विकासाचा अर्थ चोखाळणे म्हणजे स्त्रीवादी विचारसरणी होय.

वरील विवेचनावरून 'श्रीमती आशा बगे' यांच्या "भूमी" कादंबरीचा अभ्यास मी केलेला आहे. हा अभ्यास करताना स्त्री लेखिकाचा प्रवास यात कोणकोणत्या लेखक-लेखिकांनी कसे योगदान दिले याचा त्यांच्या लेखन वैशिष्ट्यासह परामर्श घेतला आहे. आशाबाईंचे व्यक्तीत्व जसे भावले तसे त्याच्या साहित्याच्या माध्यमातून मांडण्याचा मी प्रामाणिक प्रयत्न केला आहे. कादंबरीच्या उगमापासून कादंबरीचा टप्प्याटप्प्याने होत गेल्याचा विकास यामध्ये लेखक-लेखिकांनी कसे योगदान दिले याचा त्यांच्या लेखनवैशिष्ट्यांसह परामर्श घेण्याचा प्रयत्न केला

आहे.त्याच्या कादंबरीलेखणाची वाङ्मयीन सौंदर्य वैशिष्ट्ये उकलून दाखविण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला तो सर्वमान्य होईलच असे नाही. एका निखळ संशोधकाच्या भूमिकेतून या कादंबरीचा अभ्यास चिकित्सकपणे करण्याचा प्रयत्न केला आहे. व्यक्ति आणि वाङ्मयाचा प्रत्यय संबंध त्याच्या कादंबरीतून जाणवतो त्याचे साहित्य व्यक्तिनिष्ठ, आत्मनिष्ठ, अनुभवनिष्ठ आहे असे जाणवते.

# परिशिष्ट



श्रीमती आशा बगे यांचा परिचय :-

संपूर्ण नाव :- आशा अरविंद बगे.

जन्म गाव :- नागपूर.

जन्मतारीख :- २७ जुलै १९३९.

शिक्षण :- एम. ए. मराठी, एम् म्युझिक संगीत

प्रकाशित साहित्य :-

कथासंग्रह :- मारवा, पूजा, अत्तर, चंदन, मांडव, अनंत, कुरूक्षेत्र

कादंबऱ्या :- मनस्विनी, झुंबर, त्रिदल, सेतू, भूमी.

साहित्य पुरस्कार :- दोन राज्य पुरस्कार व इतर पाच पुरस्कार, डॉ.अ.वा. वर्टी पुरस्कार, दि. बा. मोकाशी पुरस्कार, भूमी कादंबरीस २००६ चा साहित्य अकादमीचा पुरस्कार प्राप्त

इ.स.१९९१ च्या लेखिकांच्या साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद (नागपूर)